महाराष्ट्रशासन

# इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नागपुर

सेंट्रलएव्हेन्युरोड,रेल्वेस्टेशनजवळ,नागपुर -४४००१८

कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७१२-२८२०२०० फॅक्स क्रमांक ०७१२-२७८०२८

ई मेल आय डी क्रमांक -: igmcn@rediffmail.com वेबसाईट -: igmc.org


जा.व.क्रमांक,इंगांशावैम/आस्था १व२/जाहिरात/ 5873 /२०२४ दिनांक 4 /०९/२०२४

प्रति,
संचालक,
माहिती व प्रसिध्दी संचालनालय,
नागपूर.

विषय -: इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नागपूर या संस्थेतील सहायक प्राध्यापकांची रिक्त पदे करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत.

मा.महोदय,

संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर या आस्थापनेवरील सहायक प्राध्यापकांची रिक्त पदे करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत या पत्रासोबत जोडण्यात आलेली जाहिरातीची सुचना जास्त खप असलेल्या अग्रगण्य वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| ०१ | कार्यालयाचे नाव दुरध्वनी व ई-मेल पत्ता | संस्थेचे नाव- इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर<br>पत्ता -: सेंट्रल एव्हेन्यु रोड,रेल्वे स्टेशन जवळ,नागपुर<br>दुरध्वनी क्रमांक -: ०७१२-२८२०२००<br>Email ID - igmcn@rediffmail.com |
| ०२ | जाहिरातीची सुचना प्रसिध्द करण्याची अंतिम तारीख | दिनांक ०८.०९.२०२४ |
| ०३ | प्रसिध्दीचे स्वरुप | जिल्हा/राज्यस्तरीय |
| ०४ | प्रसिध्दी करीता शिफारस करण्यात आलेले वृत्तपत्र | जास्त खप असलेल्या जिल्हा/राज्यस्तरीय अग्रगण्य एक मराठी व एक इंग्रजी वर्तमान पत्रांमध्ये |
| ०५ | किती वेळा प्रसिध्द करावयाची आहे. | एक वेळा |
| ०६ | देयक प्रदान करण्याकरीता कोणत्या नावाने पाठविण्यात यावे. | अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर |

सोबत -: जाहिरात

अधिष्ठाता,
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नागपूर.

# महाराष्ट्र शासन
# इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपुर

सेंट्रलएव्हेन्युरोड,रेल्वेस्टेशनजवळ,नागपुर -४४००१८

कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७१२-२८२०२०० फॅक्स क्रमांक ०७१२-२७८०२८

ई-मेल आयडी क्रमांक -: igmcn@rediffmail.com वेबसाईट -: igmc.org

जा.व.क्रमांक.इंगांशावैम/आस्था १व२/जाहिरात/ ५८७३ /२०२४ दिनांक ०५ / ०९/२०२४

-: जाहिरात :-

विषय -: सहायक प्राध्यापक,प्रसुतीपूर्व अधिव्याख्याता व वैद्यकीय अधिकारी वर्ग -२ यांची रिक्त पदे कंत्राटी तत्वावर थेट मुलाखतीव्दारे १२० दिवसाकरीता भरण्याबाबत.

संदर्भ -: १) शासन निर्णय क्र. वेतनी २०१९/प्र.क्र.०३/२०१९/वैसेवा-२, दिनांक ३१.१२.२०२०

२) शासन आदेश क्र.डिएसबी १२०१/प्र.क्र.२७६/२००१/वैसेवा-३, दिनांक १०.०८.२००१

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नागपूर या संस्थेच्या आस्थापनेवर रिक्त असलेली पदे भरण्याकरीता खालील नमुद केलेल्या अचिकित्सालयीन व चिकित्सालयीन विषयातील सहायक प्राध्यापक (गट -ब) तसेच वैद्यकीय अधिकारी (जनऔषधवैद्यकशास्त्र) यांची पदे कंत्राटी तत्वावर स्थानिक निवड मंडळामार्फत भरण्याकरीता पात्र उमेदवाराकडून खाली नमुद केलेल्या अटी व शतीच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येत आहे.

इच्छूक उमेदवारांनी सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील अर्ज संपुर्ण शैक्षणिक तपशिलासह/ आवश्यकत्या कागदपत्रे/प्रमाणपत्राच्या छायांकित प्रतिसह अधिष्ठाता यांचे कार्यालय, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नागपूर या येथे सदरील जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ते १२.०९.२०२४ पर्यंत रोजी सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत स्वहस्ते सादर करावा.

तसेच दिनांक १७.०९.२०२४ रोजी मुळ प्रमाणपत्रासह दुपारी ०१.०० वाजता अधिष्ठाता यांचे दालन, इंदिरा गांधी शासकीस वैद्यकीय महाविद्यालय,नागपूर येथे प्रत्यक्ष मुलाखतीकरीता (Walk-in-Interview) उपस्थित रहावे. मुलाखतीस उपस्थित न राहिल्यास उमेदवाराचा कंत्राटी नियुक्तीकरीता विचार करण्यात येणार नाहि.

| अ.क्र. | पदाचे नाव | विषय | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| ०१ | सहायक प्राध्यापक | शरीररचनाशास्त्र | ०१ | एम. डी. शरीररचनाशास्त्र |
| ०२ | | जीवरसायनशास्त्र | ०२ | एम. डी. जीवरसायनशास्त्र |
| ०३ | सहायक प्रध्यापक | न्यायवैद्यकशास्त्र | ०३ | एम.डी.न्यायवैद्यकशास्त्र |
| ०४ | साथरोग व तज्ञ-नि-अधिव्याख्याता | जनऔषधवैद्यकशास्त्र | ०१ | एम. डी. जनऔषधवैद्यकशास्त्र |
| ०५ | वैद्यकीय अधिकारी | जनऔषधवैद्यकशास्त्र | ०१ | एम. डी. जनऔषधवैद्यकशास्त्र |
| | | एकूण | ०८ | |

रिक्त जांगाच्या संख्येत बदल होण्याची शक्यता असल्यामुळे सदरील रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याचे अधिकार प्रशासनास राहतील. तसेच या जाहिरातीमधील कोणताही मजकूर उदा. अटी, शर्ती, नियम, पदसंख्या इत्यादी मध्ये कोणतेही बदल करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांना राखून ठेवले आहे.

सर्व जाहिरात केलेल्या रिक्त पदासाठी मुलाखती घेण्यात येत असुन,रिक्त पदाच्या उपलब्धते प्रमाणे प्रथम निवड केलेल्या फक्त उमेदवारांना नियुक्तीचे आदेश १२० दिवसाकरीता देण्यात येतील व तदनंतर रिक्तपदे उपलब्ध झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना गुणवत्तेप्रमाणे विचार करण्यात येईल. उमेदवाराची कागदपत्रे परिपुर्ण नसल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही. जर उमदेवारास एकापेक्षा जास्त पदाकरीता अर्ज सादर करावयाचा असेल तर प्रत्येक पदासाठी वेगळा अर्ज सादर करावा.

**नियमू व अटी -:**

१) वेतनश्रेणी -: सहायक प्राध्यापक यांना दिनांक ३१.१२.२०२० च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार रु.१,००,०००/- (अक्षरी एक लाख रुपये फक्त) इतके ठोक मानधन दरमहा अनुज्ञेय राहिल.तसेच विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी यांना

दरमहा रु. ७५,०००/- ठोक मानधन अनुज्ञेय राहिल सदरील वेतन संरचना मंजूर असलेल्या मुळ अनुदानातून पद कंत्राटी सेवा या शीर्षाखालून भागविण्यात येईल.

२) वयोमर्यादा :- सेवाप्रवेश नियमानुसार वयोमर्यादा खुल्या प्रवर्गाकरीता ३८ वर्षे व मागास प्रवर्गाकरीता ४३ वर्षे राहिल. उमेदवार मागास प्रवर्गात असेल तर जात व जातवैधता प्रमाणपत्र आवश्यक राहिल.

३) गुणवत्ता :- राष्ट्रीय वैद्यक आयोगाच्या मानकाची पूर्तता करण्याकरीता वरील पदाकरीता वरीष्ठ निवासी पदाचा किमान ०१ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक राहिल.

४) एमडी/एमएस किंवा एमबीबीएस अभ्यासक्रम या संस्थेतून पास केलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. उमेदवार जर या संस्थेतून पास झाला नसल्यास महाराष्ट्रातील इतर शासकीय संस्थेतून पास झाला असल्यास त्यास प्राधान्य देण्यात येईल. महाराष्ट्रातील इतर शासकीय संस्थेतून पास झालेला उमेदवार उपलब्ध नसल्यास खाजगी संस्थेतून किंवा इतर राज्यातून आलेल्या विद्यार्थ्यांना विभागाची निकड लक्षात घेता प्राधान्य देण्यात येईल.

५) मेरिट गुण पीजी आणि युजी नुसार प्राधान्य देण्यात येईल तसेच शोधनिबंध,राज्य व अखिल भारतीय स्तरावरील परिषदेतील सहभाग याचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

६) निवड करण्यात आलेला उमेदवार कार्यरत असतांना सतत जास्त कालावधी गैरहजर असल्यास किंवा काम समाधानकारक नसल्यास त्यांची कंत्राटी नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल.

७) सदर पदाकरीता उमेदवारांची नियुक्ती १२० दिवसाकरीता कंत्राटी स्वरुपाची राहिल. १२० दिवसानंतर रिक्त पद उपलब्ध असल्यास तांत्रिक खंड देवून पुन्हा १२० दिवसाकरीता विचार करण्यात येईल. सदरील नियुक्ती दरम्यान महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शासनाकडून नियमित अथवा बदलीने उमेदवार उपलब्ध झाल्यास कंत्राटी तत्वावर तात्पुरती नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल.

८) मुलाखतीस उपस्थित राहण्याकरीता कोणताही प्रकारचा प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहणार नाही,तसेच मुलाखतीस उपस्थित राहण्याकरीता या कार्यालयामार्फत कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही जर उमेदवार इतर संस्थेत कार्यरत असल्यास त्या संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहिल.

९) अर्जासोबत खालील प्रमाणपत्राच्या छायाप्रति साक्षांकित करुन जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. नंतर कोणतेही कागदपत्रे स्विकारले जाणार नाही.

**आवश्यक कागदपत्रे** -: अ) प्रथम,व्दितीय व तृतीय वर्ष एमबीबीएस तसेच एमडी/एमएस किंवा समतुल्य या सर्व परिक्षेची गुणपत्रिका व प्रयत्न प्रमाणपत्रे (ब) सर्व पदवी पदवीका व पदव्युत्तर पदवी परीक्षेची डिग्री प्रमाणपत्रे व अंतीम वर्षाची गुणपत्रिका (क) एम.एस.सी. तसेच एम.सी.आय. नुतणीकरण केलेले नोंदणी प्रमाणपत्र (ड) जातीचे प्रमाणपत्र व जात व जात वैधता प्रमाणपत्र ( लागू असल्यास) (ई) जन्म दाखला/शाळा/महाविद्यालय सोडलाचा दाखला (फ) एक वर्ष वरीष्ठ निवासी पदाचे अनुभव प्रमाणपत्र (ग) पॅनकार्ड व आधार कार्डची छायाप्रत इ. कागदपत्रे/प्रमाणपत्राचा एक छायांकित संच अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

**-: सदर जाहिरात या महाविद्यालयाच्या iggmc.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

अधिष्ठाता,
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नागपुर.

प्रति -:

१) संबंधित प्राध्यापक व विभाग प्रमुख,इंगांशावैम,नागपूर.
२) सर्व अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालये यांना माहितीकरीता सविनय सादर.
३) नोटीस बोर्ड करीता, इंगांशावैम,नागपूर.